महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक, कार्यालय
अमरावती वनविभाग, अमरावती कॅम्प, अमरावती 444602
दुरध्वनी क्रमांक 0721-2662814, (वैय.) 2550144
ई मेल - dycfamravati@mahaforest.gov.in,dcfamtn14@gmail.com

आदेश क्रमांक ६६९ अमरावती, दिनांक २५/०८/2023

विषय:- विनंती बदल्या- वाहन चालक संवर्गातील कर्मचा-यांचे बदली आदेश.

संदर्भ-
1. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध, अधिनियम 2005
2. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही 2017/ प्र.क्र 415/कार्यासन 12 दि.09.04.2018
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे स्थायी आदेश क्र.कक्ष- 07/आस्था/मुले/प्र.क्र.182/230 दि 09/08/2021
4. या कार्यालयाचे पत्र क्रमांक/कक्ष-11/आस्था/1890, दिनांक 23/08/2023
5. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांचे पत्र क्रमांक/ कक्ष- 8/आस्था/TN-1/विनंती बदली प्रस्ताव/1590, दि. 25/08/2023

000000

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध, अधिनियम 2005 अंतर्गत व शासन निर्णय दिनांक 09.04.2018 मधील तरतुदी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य ,नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-7/आस्था/मुले/प्र.क्र.182/230/21-22 दि. 09.08.2021 तसेच महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही 2017/ प्र.क्र 415/कार्यासन 12, दिनांक 09.04.2018 अन्वये, प्राप्त शक्तीचा वापर करुन, दिनांक 21/08/2023 रोजी, मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती येथील "कुलाढाण" सभागृह येथे, दुपारी 01.00 वाजता पार पडलेल्या नागरी सेवा मंडळाचे बैठकीत समितीने केलेल्या शिफारशीचे अनुषंगाने, संदर्भ क्रमांक 5 अन्वये, सक्षम प्राधिका-याच्या लगतच्या वरिष्ठ अधिका-याची मान्यता प्राप्त झालेली असल्याने खालील वाहन चालक संवर्गातील कर्मचा-यांची विनंती बदलीने पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

**संवर्ग- वाहन चालक**

| अ.क्र. | वाहन चालकांचे नाव (सर्वश्री) | सद्याचे कार्यरत ठिकाण | बदलीकरिता समितीने केलेली शिफारस | |
|---|---|---|---|---|
| | | | वनविभाग | ठिकाण |
| 1 | श्री बि. ज. नंदवंशी | विभागिय कार्यालय, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा | मेळघाट प्रा. विभाग, परतवाडा | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) घटांग यांचे कार्यालय मेळघाट प्रा. विभाग, परतवाडा |
| 2. | श्री. मिलिंद लक्ष्मणराव वानखडे | वनपरिक्षेत्र अधिकारी, (वन्यजीव) आकोट, यांचे कार्यालय, मेळघाट वन्यजीव विभाग परतवाडा | निर्देशन विभाग | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती |
| 3. | श्री. संदिप गुलाबराव मोरे | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) घटांग यांचे कार्यालय मेळघाट प्रा. विभाग, परतवाडा | कार्य आयोजना विभाग, अमरावती | उप वनसंरक्षक, कार्यआयोजना विभाग, अमरावती |

1. उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांच्या नियंत्रक अधिका-यांना निर्देश देण्यात येते की, सदर आदेश संबंधित कर्मचारी यांना निर्गमित करुन संबंधितांना नविन बदलीचे ठिकाणी रुजू होणेकरिता स्थानिक व्यवस्था करुन कोणत्याही सबबीचा विचार न करता, तात्काळ कार्यमुक्त करुन तसा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा. तसेच संबंधित कर्मचारी बदलीचे ठिकाणी रुजू झाल्यानंतर, त्याबाबत अहवाल सादर करावा. तसेच त्यांचे वेतन व भत्ते पूर्वीचे विभागातुन आहरीत व संवितरीत केले जाणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

2. वरिल संबंधित कर्मचारी यांचे नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होईपर्यंत संबंधित कर्मचा-यांची कार्यालयाच्या पुर्वपरवानगी शिवाय रजा मंजूर करुन नये, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 मधील नियम 30 (सी) नुसार मुळ कार्यालयाने बदली झालेल्या कर्मचा-यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित कर्मचा-यांना नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मुळ कार्यालयाकडे बदली झालेल्या कर्मचा-यांच्या रजेचे अर्ज पाठविल्यास अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

3. सदरहू बदली आदेश नुसार संबंधित कर्मचारी यांना तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम 1979 मधील नियम 23 चे उल्लंघन करणारे असल्यामुळे ती गैरवर्तणुक असुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

4. सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू होतील, वरिलप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करुन अहवाल कार्यालयास सादर करावा.

5. सदर बदली संबंधित कर्मचा-यांचे विनंतीनुसार करण्यात येत असल्याने, त्यांना पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

( अमितकुमार मिश्रा )
उपवनसंरक्षक
अमरावती वनविभाग,अमरावती

क्रमांक कक्ष -11/आस्था/बदली/ 9९9८ /2023-24
अमरावती दिनांक 24/08/2023.

प्रति,
वरिलप्रमाणे संबंधित कर्मचारी
मार्फत :- संबंधित नियंत्रण अधिकारी

**प्रतिलिपी**- मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक व्याघ्र प्रकल्प मेळघाट,अमरावती यांना माहीती करीता सविनय सादर
**प्रतिलिपी**- मुख्य वनसंरक्षक ( प्रादेशिक) अमरावती यांना माहीती करीता सविनय सादर
**प्रतिलिपी** - वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण विभाग,अमरावती यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषीत
**प्रतिलिपी** - उपवनसंरक्षक, मेळघाट प्रादेशिक वनविभाग,परतवाडा यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
**प्रतिलिपी** - उपवनसंरक्षक, सिपना वन्यजिव विभाग, परतवाडा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
**प्रतिलिपी**- उपवनसंरक्षक, गुगामल वन्यजिव विभाग, चिखलदरा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
**प्रतिलिपी**- उपवनसंरक्षक, अकोट वन्यजिव विभाग, आकोट यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित
**प्रतिलिपी**- विभागीय वनअधिकारी, मेळघाट वन्यजिव विभाग, परतवाडा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
**प्रतिलिपी** - विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
**प्रतिलिपी** - आदेशफाईल